# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

## औरंगाबाद – ४३१ ००४ महाराष्ट्र (भारत)

*(नॅक समितिद्वारे बी+ दर्जा प्राप्त)*

प्रा. विजय पांढरीपांडे
बी.ई., एम. टेक., पीएच.डी.
कुलगुरू

दुरध्वनी : (०२४०) २४०३३९९/ २४०३४००
कार्यालय : (०२४०) २४०३१११
फॅक्स नं. : (०२४०) २४०३११३/२४०३३३५
E-mail : vc@bamu.net
Website : www.bamu.net


।। गुणवत्ता आणि सामाजिक बांधिलकीची बावन्न वर्षे ।।

**नववर्षाच्या शुभेच्छा..**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सर्व प्राध्यापकांना, विद्यार्थ्यांना, कर्मचारी वर्गाला नववर्षाच्या अनेक हार्दिक शुभेच्छा. नव्या वर्षाच्या प्रारंभी काही तरी संकल्प करण्याची प्रथा आहे. भविष्यकाळातील विविध क्षेत्रातील आव्हाने लक्षात घेऊन, त्यांचा सखोल अभ्यास करून जागतिक स्पर्धेला तोंड देण्यासाठी आपणा सर्वांना सज्ज व्हायचे आहे. ज्ञानार्जन, ज्ञानसंवर्धन हे विद्यापीठाचे उद्दिष्ट असले तरी ते तिथेच संपत नाही. आज ह्या ज्ञानाचे संपत्तीत परिवर्तन करण्याची गरज आहे. भविष्यातील गुतागुंतीच्या समस्यांना सोप्यात सोपी उत्तरे शोधून काढण्याचे आव्हान आजच्या तरूण विद्यार्थ्यांपुढे आहे. त्यासाठी पारंपारिक, एकांगी, चौकटी बध्द अभ्यासक्रमाचा अट्टहास सोडून विविध शाखांचा एकत्रित अभ्यास करणे गरजेचे आहे. विद्यापीठातील विभाग हे दुभागलेले आपण बघतो. ह्या सर्व विभागातील प्राध्यापकांनी, विद्यार्थ्यांनी मुक्तपणे एकत्र यायला हवे. तीनचार विभागाचे विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक एकत्र येऊन प्रकल्प राबवू शकतात. अशा प्रकल्पाचे निष्कर्ष, त्यांची उपयुक्तता ही अधिक समाजोपयोगी असेल. सृजनशीलता आणि तंत्रज्ञान ह्यांचा परस्पर संबंध जोडून मेळ घालणं हाच २१ व्या शतकात संपत्तीचे मुल्य निर्माण करण्याचा उत्तम मार्ग आहे. एखाद्या व्यक्तिमत्त्वात जर कला, समाजशास्त्र आणि विज्ञान अशा विविध शाखांतील सर्जनशीलता एकवटली असेल तर ती व्यक्ती ख-या अर्थाने विद्वान म्हटली पाहिजे. आजच्या शिक्षणाचे, संशोधनाचे उद्दिष्ट हे माणूस घडविणे, सर्वसामान्य माणसाचे एकूणच जीवन सुसह्य,सुखदायी करणे हेच असायला हवे. आपण जे काही करू ते उत्कृष्टच करू, गुणवत्तेत कसलीही तडजोड करणार नाही असा आपला प्रयत्न हवा. निर्धार हवा. “चलता है” स्वरूपाचा

"कॅज्युअल अप्रोच" काही कामाचा नाही. तुम्ही वेळेची किंमत केली नाही तर जग तुमची किंमत करणार नाही हे आजच्या तरूण पिढीने लक्षात घ्यावे. विघातक कार्यात वेळ वाया घालवू नये. सृजनात्मक, "सत्यंम शिवम् सुंदरम" स्वरूपाचे खूप काही आहे करायला. आज मूल्यधिष्ठित नैतिक शिक्षणाची नितांत गरज आहे. आपल्या देशाच्या समस्या ह्या यूरोप-अमेरिकेच्या सूत्रांनी सोडविता येणार नाहीत. आपल्या समस्यांचे मूळ, उत्तर हे आपल्याच मातीत शोधावे लागणार. आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाने जग जवळ आले आहे. ह्या तांत्रिक सुविधांचा पुरेपूर लाभ घेत आपली पुढची वाटचाल झाली पाहिजे. विद्यापीठ हे अभ्यासक्रमाची फक्त रूपरेखा ठरविणार. शिक्षण कसे द्यायचे, कसे घ्यायचे हे प्राध्यापकांवर, विद्यार्थ्यांवर अवलंबून असणार. ही शिक्षणाची देवाण घेवाण दर्जाच्या दृष्टीने अशी असायला हवी की आपल्या पदवी प्रमाणपत्राचा, आपल्या विद्यापीठाचा, आपल्या प्राध्यापकांचा आपल्याला अभिमान वाटेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या भारतरत्न महामानवाचे नाव धारण करणा-या ह्या विद्यापीठातून नोकरी मागणारा नव्हे तर नोकरी देणारा उद्योजक विद्यार्थी निर्माण झाला पाहिजे. घेणा-यापेक्षा देणा-या हाताची प्रतिष्ठा जास्त असते हे विद्यार्थ्यांनी समजून घ्यावे. येती २-३ वर्षे आपल्या विद्यापीठासाठी नवे, सकारात्मक क्रांतीकारक बदल घडविणारे असतील असा विश्वास मी बाळगून आहे. उच्चशिक्षण क्षेत्रात ह्या प्रकारचे चांगले परिवर्तन घडले तरच डॉ. बाबासाहेबांचे स्वप्न साकार झाले असे आपल्याला अभिमानाने म्हणता येईल. हे स्वप्न उघड्या डोळ्यांनी बघायचे आहे. आपण सर्वांनी मिळून साकारायचे आहे. शब्दांचे बुडबडे कामाचे नाहीत. कृतीची गरज आहे. प्रामाणिक प्रयत्नांची, निष्ठेची गरज आहे. ह्या जगात अशक्य काहीही नाही. आपली ईच्छाशक्ती प्रबळ हवी म्हणजे झाले. कुलगुरू ह्या नात्याने पहिले पाऊल मी पुढे टाकीन. पण ह्या विद्यापीठाचे, मराठवाड्याचे, महाराष्ट्राचे भवितव्य माझ्यामागून येणारी शेकडो, हजारो पावलेच ठरवतील ह्याची मला खात्री वाटते. ह्या नव्या वर्षातला प्रत्येक दिवस हा आपल्याला पुढे नेणारा असेल, आपल्यात चांगुलपणाचा सद्भाव रूजविणारा असेल, एकमेकांना जवळ आणणारा असेल ह्यांची मला खात्री वाटते. Let us do great things together!

विजय पांढरीपांडे

विजय पांढरीपांडे
कुलगुरू